अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. २४ मार्च २०२४ । वर्ष : २२ वे अंक : १७५ वा किंमत : ५ रुपये पाने १२


धक्का!!

चौथा सामना
Vs
राजस्थान रॉयल्स वि. लखनौ सुपरजायंट्स्
वेळ : ३.३० वा. स्थळ : जयपूर

पाचवा सामना
मुंबई इंडियन्स वि. गुजरात टायटन्स
वेळ : ७.३० वा. स्थळ : अहमदाबाद

# भाजपानंतर पवारांकडूनही कात्रजचा घाट...आता स्वबळाची वाट

# ना कमळ, ना तुतारी... हर हर महादेव म्हणायची ही चोरी

**शिवाजी भोसले/सोलापूर**

**माढा लोकसभा निवडणूक कोणत्याही परिस्थिती लढवाचीच या जिद्दीने हर हर महादेवची घोषणा देत शंभू महादेवांच्या साक्षीने विडा उचलणाऱ्या धैर्यशील मोहिते पाटील यांना भारतीय जनता पक्षापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवारांनी कात्रजचा घाट दाखवल्याने ही आर-पारची लढाई त्यांना आता स्वबळावरच लढावी लागणार आहे.**


माढ्याची निवडणूक भाजपाकडून लढण्यासाठी सज्ज असणाऱ्या मोहिते पाटलांना भाजपाने डावलले आणि उमेदवारीची माळ विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या गळ्यात पडली. त्यामुळे मोहिते पाटलांवर त्यांच्या कार्यकर्त्यांकडून इतका कमालीचा दबाब आला की त्यांना बंडखोरी करण्याशिवाय अन्य पर्यायच उरला नाही.

धैर्यशील मोहिते पाटील यांनी भाजपचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या विरोधात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुतारी या चिन्हावर निवडणूक लढवण्याचा आग्रह त्यांच्या समर्थकांनी धरला आणि त्यादृष्टीने मोहीमही उघडली.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवारांसाठी माढ्यापेक्षा सद्यस्थितीत बारामती मतदारसंघातील सुप्रिया सुळेंची उमेदवारी प्रतिष्ठेची बनलीय , साहजिकच तेथील समीकरणांचा विचार करत शरद पवारांना माढ्याची जागा राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांच्यासाठी सोडायचा निर्णय घ्यावा लागतोय .त्यामुळे तुतारी चिन्हावर निवडणूक लढण्याचा कार्यकर्त्यांचा आग्रह असला तरी तो पर्याय मोहिते पाटलासमोर उरत नाही. आपला निर्णय १२ एप्रिल रोजी कळेल असे म्हणणाऱ्या धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासमोर आता अपक्ष लढण्याखेरीज अन्य पर्याय उरत नाही....

'माघार नाहीच... हर हर महादेव...आमचं ठरलंय..' असा नारा देत अकलूजकर मोहिते-पाटील आपल्या समर्थकांसह गाव दौर्यांमधून माढा मतदार संघ अक्षरशः पिंजून काढताहेत. 'चाहे कुछ भी हो' माढा लोकसभा लढवायचीच. मोहिते-पाटील ब्रॅंड काय आहे, हे दाखवूनच द्यायचं.. या इर्षेने पेटलेले मोहिते-पाटील समर्थक म्हणताहेत 'लढेंगे और जितेंगे'. या टप्यावर शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या तुतारीचं चिन्ह लढण्याबद्दल समर्थकांचा मोहिते-पाटलांसाठी आग्रह आहे. तथापि, राष्ट्रवादीच्या कोट्यातून माढ्याची जागा रासप म्हणजे राष्ट्रीय समाज पक्षाला सोडण्याचा निर्णय शरद पवार यांच्याकडून घेतला जात असल्यानं शरद पवार गटाचे पाठबळ घेऊन 'तुतारी' चिन्हावर लढण्यासाठीचा मोहिते-पाटील यांच्यासाठीचा सक्षम पर्याय संपतोय.

दरम्यान, शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या निर्णयानुसार, महादेव जानकर हेदेखील माढ्यातून लढण्याला सज्ज होताहेत. जानकरांनी ते स्पष्टही केलं. माढा लोकसभेच्या संदर्भातील ही नवी घडामोड मोहिते-पाटील यांची उमेदवारीबाबत कोंडी निर्माण करणारी आहे, असं मानलं जात आहे. 'आता माघार नाहीच' हे शब्द सत्यात उतरविताना मोहिते-पाटील यांना तुतारीचा पर्याय बाजूला करावा लागल्यास अपक्ष लढण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय असू शकत नाही हा मुद्दा अधोरेखीत केला जात आहे. विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना भाजपानं उमेदवारी देण्यातून अकलूजकर मोहिते-पाटील यांची सुरवातीलाच कोंडी झाली. ती फोडण्यासाठी जनमताचा कौंल घेऊन मोहिते-पाटील हे माढा लोकसभेच्या महासंग्रामात उतरण्यासाठी प्रयत्न करताहेत ,शरद पवार यांच्या राष्ट्रवादी गटाचं समर्थन मिळालं तर धैर्यशील मोहिते-पाटील यांचा मार्ग सुकर होऊ शकतो, असा अंदाज बांधून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी गटात प्रवेश करुन तुतारी चिन्हावर निवडणूक लढविण्याची गळ समर्थकांकडून घातली जात आहे.खासदार नाईक-निंबाळकर यांना उमदेवारी दिल्यानं मोहिते-पाटील यांना पहिली अडचण झाली. त्यानंतर शरद पवार राष्ट्रवादी गटाकडून तुतारीचा पर्याय काढून निवडणूक लढवावी म्हटलं तर शरद पवार गटानं आपल्या कोट्यातून ही जागाच रासपला देऊन टाकल्याने मोहिते-पाटील यांची दुसरी अडचण झाली आहे.





### अपक्ष चिन्हावर लढणं हाच पर्याय

शरद पवार राष्ट्रवादी गटाकडून लढण्याचा निर्णय मोहिते-पाटील यांच्यासाठी संपुष्टात आल्यानंतर त्यांच्यासाठी अपक्ष म्हणून लढण्याशिवाय दुसरा पर्यायाच असू शकत नाही. त्यांना अपक्ष चिन्हावर लढावे लागेल असे दिसते. मोहिते-पाटील यांचे सध्याचे दौरे लक्षात घेता, ते लढण्यावर ठाम राहतील हे स्पष्ट आहे.

### हर हर महादेवचे काय?

मोहिते पाटील समर्थकांनी मोठ्या उत्साहात हर हर महादेव ची घोषणा केली आणि हा नारा संपूर्ण मध मतदारसंघात पोहोचवला. मात्र आता तुतारी चिन्हावर महादेव जानकर मैदानात उतरत असल्याने हर हर महादेवच्या नाऱ्याने महादेव जानकर यांचा तर प्रचार आपल्या कडून होत नाही ना अशी चर्चा मोहिते पाटील समर्थक करताहेत.

# कसं काय पाटील बरं हाय का? बंडखोरीचं ऐकलं खरं हाय का?



### बंडखोरीसाठी निशान तयार पण, निर्णायक भूमिकेची फुटेना कोंडी

माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपकडून विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना उमेदवारी देण्यात आली असून भाजपा पक्षात कार्यरत असणारे धैर्यशील मोहिते-पाटील यांना पक्षाने तिकीट नाकारले आहे. पक्षाकडे उमेदवारीसाठी इच्छा व्यक्त करूनही उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा थेट 'शिवरत्न' गाठले. माढा लोकसभा यंदा जिंकायचीच त्यासाठी धैर्यशीलभैय्या यांनी उभे राहिलेच पाहिजे.

यासाठी कार्यकर्त्यांनीच शक्ती प्रदर्शन केले. परंतू, अद्याप अधिकृतरित्या धैर्यशील मोहिते-पाटील यांनी उमेदवारी जाहीर केली नसली तरी कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर त्यांनी समांतर यंत्रणा उभा करून गावदौऱ्याची सुरुवात केली आहे. कोणत्याही परिस्थितीत माढा लोकसभेची निवडणूक लढवायचीच याची तयारी करून 'हर हर महादेव' ची घोषणा देखील केली आहे.

एकूणच भाजपने दिलेल्या उमेदवाराबद्दल नापसंती व्यक्त करून भाजप विरुद्धचे हे बंड १९५२,१९७२,१९८० ची पुनरावृत्ती करणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.




**विष्णू सुरवसे/उत्तर सोलापूर**

**सोलापूर लोकसभा निवडणुकीची हवा आता चांगलीच तापू लागली आहे. काँग्रेसने आमदार प्रणिती शिंदे यांना उमदेवारी घोषित केली. भाजपाचा उमदेवारीही येत्या दोन दिवसात घोषित होईल, असे अधिकृतरित्या सांगण्यात आले. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, प्रमुख पक्षाचे आमदार, नेते, पुढारी हे रिचार्ज होत असले तरी अद्याप प्रमुख कार्यकर्ते मात्र अद्याप निवडणुकीच्या नेटवर्कपासून दूर आहेत. त्यांचं सीम अद्याप अनॲक्टीव्ह अवस्थेतच आहेत.**

सोलापूर जिल्ह्यात सध्या लोकसभेची निवडणूकीची तयारी बैठका, गावभेटीसह इतर मार्गाने जोरात चालू आहे. काँग्रेस कडून आमदार प्रणिती सुशीलकुमार शिंदे तर भाजप व इतर मित्र पक्षाकडून कोणताही उमेदवार फायनल झालेला नाही ? सहा विधानसभा असलेल्या मतदार संघातील विद्यमान दक्षिण- आमदार सुभाष देशमुख, मोहोळ -आमदार यशवंत माने, शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख,अक्कलकोटचे सचिन कल्याणशेट्टी, शहर मध्यच्या आमदार प्रणिती शिंदे,पंढरपूर-मंगळवेढ्याचे समाधान अवताडे हे विद्यमान आमदार आहेत. भाजप व इतर मित्र पक्षाकडून अजूनही प्रणिती शिंदे यांच्या तोडीस तोड उमेदवार दिलेला नाही. भाजप व मित्र पक्षातील विद्यमान आमदार लोकसभेच्या मैदानातून विधासभेचे तयारी करत असले तरी कार्यकर्ते मात्र रिचार्ज झाले नाहीत

मोहोळ-पंढरपूर मतदार संघाचे विद्यमान आमदार यशवंत माने समोर शिंदे गटाचे राजू खरे यांचा विविध कामातून,प्रचारातून आव्हान उभे केलं आहे. दक्षिणमध्ये विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांच्यापुढे काँग्रेसमध्ये घर वापसी करण्याच्या तयारीत असलेले माजी आमदार दिलीप माने यांनीदेखील प्रणिती शिंदे यांच्या लोकसभेच्या आडून दक्षिणमधून काँग्रेसतर्फे विधान सभेची तयारी केली आहे. भाजपाकडून लोकसभेचा उमेदवार घोषित झाल्यानंतर आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान अवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार यशवंत माने हे सगळे लोकप्रतिनिधी ॲक्शन मोडवर येतील. त्यांच्यासोबत पक्षाचे पदाधिकारी, पुढारी, नेते, प्रमुख कार्यकर्ते सगळेच ॲक्टीव्ह होतील. निवडणुकीचा प्रचाराचा धुराळा जोरकसपणे उडणार आहे. त्यासाठी आणखी काही दिवस लागणार आहेत.

### विधानसभेची रंगीत तालीम

पुढच्या काहीच महिन्यात विधानसभेच्या निवडणुका लागणार आहेत. लोकसभेच्या समीकरणावरच विधानसभेचे गणित अवलंबून असल्याने लोकसभेची निवडणूक विधानसभेची रंगीत तालीम असणार आहे हे मात्र निश्चितच म्हणूल आमदार तशी तयारी करणार असल्याचे दिसते.

## मोहिते-पाटील : बंडखोरीची परंपरा जुनीच अध्याय मात्र नवा

**देवानंद साळवे/अकलूज**

**महाराष्ट्राच्या राजकारणातील बंड प्रस्थ असलेल्या मोहिते-पाटील घराण्याचा राजकीय संघर्ष तसा मोठा आहे. इतक्या सहजासहजी तिसऱ्या पिढीपर्यंत त्यांचे अखंड राजकारण आणि समाजकारण झालेलं नाही. त्यांच्या नेतृत्वाला संघर्षाची किनार आहे. राजकारणातील जमेच्या काही गोष्टी मोहिते-पाटील यांच्या पथ्यावर नशिबानं पडल्या. तर काही त्यांनी पाडून घेतल्या. 'जीवात जिवमान असे तोपर्यंत जनसेवा करु' हे ब्रीद घेऊन लोकांसाठी नेतृत्व करताना राजकारणाच्या चढ-उतारात त्यांना प्रसंगी बंडखोरीचं निशान फडकवावं लागलं. बंडखोरी हा विषय त्यांच्यासाठी नवा नाही. माढा लोकसभेच्या उमदेवारीवरुन त्यांनी भाजपाविरोधात बंडाचा पवित्रा घेतला तर त्यांच्याबाबतीत नवं असं काही नाही. या घराण्याची 'बंडखोरीचा परंपरा तसी जुनीच आहे, पण अध्याय नवा असंच म्हणता येईल. मोहिते-पाटील घराण्याच्या आजवरच्या राजकीय प्रवासामधील बंडखोरीचं हे सिंहावलोकन...**




**अकलूज** : बंडखोरीचा पवित्रा घेत १९८० मध्ये ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांनी शिडी हे चिन्ह घेऊन निवडणूक लढविली. शिडीच्या चिन्हासह विजयदादांना आणि तत्कालीन त्यांचे समर्थक.

माळशिरस तालुक्यातील राजकीय घराणे मोहिते-पाटील यांच्याबाबतीत इतिहास घडला आहे. माढा लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं उमदेवारी नाकारल्यानंतर बंडाचं झेंडा फडकवावा, असे हट्ट मोहिते-समर्थकांचा आहे, त्यावरुन आजवर मोहिते-पाटील यांना फडकवाव्या लागलेल्या बंडाची चर्चा झडू लागली आहे. बंडाच्या जुन्या इतिहासाला मोहिते-पाटील समर्थकांमधील चर्चेतून उजाळा मिळू लागला आहे.

### बंडाची सलामी जनमताचा तराजू

सहकाराची गंगा सोलापूर जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यात ज्यांनी आणली आणि विकासाचे नवे पर्व निर्माण केले असे सहकार महर्षि शंकरराव नारायण मोहिते-पाटील यांच्या उमेदवारीची ही गोष्ट.... स्वतंत्र भारततली पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५२ ला जाहीर झाली. माळशिरस मतदारसंघातून उमेदवार नेमका कोण असावा, याची अकलूज गावात चर्चा झाल्यानंतर शंकररावांना उभे राहण्यासाठी कसेतरी तयार करण्यात आले. काँग्रेसकडून तिकीट मागितले गेले आणि ऐनवेळी काँग्रेसने माळीनगरच्या जगन्नाथ गिरमे यांना तिकीट दिले. १९५२ ला शंकरराव मोहिते-पाटील यांचे समस्त कार्यकर्ते एकत्र आले आणि कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवायची अशी ठरले. अपक्ष म्हणून निवडणुकीत फॉर्म भरला. मित्रांच्या, कार्यकर्त्यांच्या आर्थिक सहकार्याने, अकलूज परिसरात केलेल्या कार्याने, स्वतः च्या हिमतीवर शंकरराव मोहिते-पाटील तराजू या चिन्हावर अपक्ष म्हणून प्रचंड मतांनी निवडून आले. पुढे १९५७ ला शेकाप,१९६२,१९६७ काँग्रेस पक्षाकडून ते आमदार झाले. परंतु पुन्हा १९७२ ला पुत्र विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या लग्नातील 'लक्ष भोजनामुळे' काँग्रेस पक्षांने त्यांना तिकीट नाकारले तरीही शंकरराव मोहिते-पाटील यांनी स्वतःचे मित्र चांगोजीराव देशमुख यांना बिनविरोध आमदार म्हणून निवडून आणले.


॥ जय भारत ॥
माळशिरस तालुक्यांतील मुंबई असेंब्लीच्या
मतदार बंधूभगीनीस नम्र विनंती
मी येत्या लेजीस्लेटीव्ह असेंब्लीच्या निवडणूकीसाठीं
– स्वतंत्र उमेदवार –
म्हणून माळशिरस तालुका मतदार संघा तर्फे उभा आहे
करीतां आपली व आपल्या कुटुंबीयांची व इष्ट मित्रांची सर्व मते मलाच घावीत अशी विनंती आहे. मी कोणत्याही पक्षाचा पुरस्कृत अगर मान्यताप्राप्त उमेदवार नाही. मी जनतेच्या सहानुभूती वरून उभा राहिलो आहे व मी पक्षापेक्षां जनतेलाच श्रेष्ठ समजतो. माझी आजपर्यंतची जनतेची सेवा लक्षात घेऊन आपण मलाच आपली व इतरांची मते देवून निवडून आणाल असा मला पूर्ण भरवसा आहे. मी सर्वदा सदैव तुमचेच हितांकरीतां झटेन हे निराळे सांगावयास नको
माझी खूण तराजू आहे.
आपला
शंकरराव नारायणराव पाटील अकलूज.
श्री बाळकृष्ण प्रेस अकलूज.

अकलूज : १९५२ मध्ये स्व.शंकरराव मोहिते-पाटील यांनी बंडाचे निशान फडकावित आमदारकीची निवडणूक लढविली होती, या निवडणूकीच्या प्रचारासाठी त्यावेळी काढण्यात आलेली पांपलेट.

### बंडखोरीतून उपमुख्यमंत्रीपदापर्यंत शिडी

जनता दलातून १९७८ साली माळशिरस विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले श्यामराव पाटील १९८० च्या निवडणुकीसाठी काँग्रेसमध्ये आले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शंकरराव चव्हाण यांच्या शिफारशीने विद्यमान उमेदवार म्हणून काँग्रेसने माळशिरस मधून श्यामराव पाटील यांना तिकीट जाहीर केले. सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असणाऱ्या विजयसिंह मोहिते-पाटील यांनी निवडणुकीत उभे न राहता पक्षाने दिलेला उमेदवार निवडून आणू असे जाहीर केले आणि 'शिवरत्न' वर कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी सुरु केली. विजयदादांना कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवायची अशी गळ कार्यकर्त्यांनी घातली. आणि अखेर विजयसिंह मोहिते-पाटील अपक्ष म्हणून शिडी या चिन्हावर उभे राहिले वडील सहकार महर्षि यांचा वारसा, अकलूज चे सरपंच ते जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इथपर्यंत कामाचा आवाका आणि निष्ठावान कार्यकर्त्यांची सोबत यामुळे विजयसिंह मोहिते पाटील अपक्ष म्हणून 'शिडी' चिन्हावर निवडून आले. १९८० मध्ये माळशिरस या मतदारसंघातून विजयदादा पहिल्यांदा आमदार झाले आणि तेथून सुरू झालेला राज्याच्या राजकारणातला प्रवास थेट उपमुख्यमंत्रिपदापर्यंत जाऊन पोहचला. त्यामुळे साहजिकच सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचा दबदबा वाढतच गेला. तब्बल २९ वर्षे आमदार म्हणून विधानसभेत माळशिरसचे प्रतिनिधित्व केले.

### आमदारकीसाठी पुन्हा नव्या बंडाचे निशान

१९५२ साली ज्या काँग्रेस पक्षांनी त्यांना तिकीट नाकारले तीच गोष्ट १९७२ ला झाली. परंतु, स्वतः च्या हिमतीवर आणि कर्तृत्वावर १९७२ ला देशमुख यांना बिनविरोध आमदार करून विधानसभेत पाठविले. १९७८ ला पाणीवचे श्यामराव पाटील हे माळशिरस विधानसभा मतदार संघातून निवडून आले.१९७९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर केंद्रामध्ये पुन्हा इंदिरा गांधी सत्तेवर आल्या. सत्तेवर आल्यानंतर इंदिरा गांधींनी देशातील ९ बिगर काँग्रेस सरकारे बरखास्त केली. १७ फेब्रुवारी १९८० रोजी इंदिरा गांधींच्या शिफारशीवरून राष्ट्रपती शरद पवार यांचे पुलोद सरकार बरखास्त करून महाराष्ट्रात प्रथमच राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. ८ जूनपर्यंत म्हणजे सुमारे चार महिने राष्ट्रपती राजवट सुरू होती. दरम्यान, इंदिरा गांधींनी महाराष्ट्रात मध्यावधी निवडणुका जाहीर केल्या.

### तिसऱ्या पिढीच्या बंडखोरीचं काय?

एकूणच मोहिते-पाटील यांना राजकीय पक्षाने तिकीट नाकारणे किंवा कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर अपक्ष म्हणून निवडणूकीला सामोरे जाणे हा वारसा नवा नाही. तेंव्हा तिसऱ्या पिढीत नेमकं काय घडणार याची उत्सुकता संपूर्ण सोलापूर जिल्ह्याला लागून राहिली आहे.